# -: जाहिर निविदा :-

जिल्हा व अति. सत्र न्यायालय, नेवासा येथील मा. जिल्हा व अति. सत्र न्यायाधीश, नेवासा यांचेकरीता खालीलप्रमाणे वस्तुंची आवश्यकता आहे.

| अ. क्र. | वस्तुचे नाव | वस्तुचे तपशिल | नग |
|---|---|---|---|
| १ | डायस चेअर | डायस चेअर लंबर सपोर्टसह | २ |
| २ | रिव्हॉल्वीग चेअर | रिव्हॉल्वीग चेअर लंबर सपोर्टसह | १ |
| ३ | टेबल लाकडी | १. ४२¹/² X ८१ X ३४ (ड्रॉवरसह)<br>२. ३९ X ५१ X ३४<br>३. ४२¹/² X ८१ X ३२<br>४. ३६ X ७२ X ३१ (ड्रॉवरसह)<br>(सर्व मापे इंचामध्ये) | ४ |
| ४ | नेटची खुर्ची | नेटची खुर्ची (लोखंडी) - एस टाईप - केन | २ |
| ५ | निजीकक्षामधील खुर्ची | कुशन असलेली खुर्ची | ८ |
| ६ | लोखंडी रॅक | उंची ८ फुट, लांबी ३ फुट, रुंदी १¹/² फुट, कप्पे ६ | ४ |

तरी जिल्हा व अति. सत्र न्यायालय, नेवासा येथील मा. जिल्हा व अति. सत्र न्यायाधीश, नेवासा यांचेकरीता वरीलप्रमाणे वस्तुंची आवश्यकता आहे. सदर वस्तुंची स्थानिक बाजारपेठेतुन खरेदी करणे आवश्यक असल्यामुळे त्याबाबतची दरपत्रके नेवासा येथील स्थानिक बाजारपेठेतील अधिकृत विक्रेत्यांकडून मागविण्यात येत असून त्यासाठी खालील अटी व शर्ती लागू राहतील.

<u>अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-</u>

१. अधिकृत विक्रेता फर्मचा विक्रेता परवाना असणे आवश्यक आहे.

२. अधिकृत विक्रेता फर्मचे नावाने पॅन क्रमांक व टॅन क्रमांक असणे आवश्यक आहे.

३. अधिकृत विक्रेता फर्मचे नावाने जी.एस.टी. क्रमांक असणे आवश्यक आहे.

४. अधिकृत विक्रेता यांनी वस्तुंचे दरपत्रक दिनांक ०१/०१/२०२५ रोजी सायंकाळी ०६-०० पुर्वी सिलबंद पाकीटात देणे आवश्यक आहे.

५. सिलबंद पाकीटावर दरपत्रक कोणत्या वस्तुंचे आहे ते लिहिणे आवश्यक आहे.

६. सिलबंद पाकीटावर मा. जिल्हा न्यायाधीश-१ व अति. सत्र न्यायाधीश, जिल्हा व अति. सत्र न्यायालय, नेवासा यांचे नाव व पत्ता लिहिणे आवश्यक आहे.

७. सिलबंद पाकीटे स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधी/पोस्टाद्वारे या कार्यालयाच्या आवक विभागाकडे आणून दयावेत.

८. दरपत्रकामध्ये यादीतील वस्तुचे दर लिहिणे आवश्यक आहे तसेच अपूर्ण दरपत्रक नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे. सदर दरपत्रक सादर करताना आपणास कोणतीही अतिरीक्त माहीती देणे आवश्यक असल्यास सदर माहीती दरपत्रकामध्ये नमुद करण्याची तसेच आवश्यकतेनुसार कार्यालयास भेट देण्याची परवानगी देण्यात येते आहे. अधिकृत विक्रेता यांनी दरपत्रकासोबत सदर वस्तुंचे फोटो व तपशील देणे आवश्यक आहे.

९. तत्पर व जलद सेवा देणा-या फर्मना प्राधान्य देण्यात येईल तसेच दरपत्रक स्विकारल्यास सदर वस्तु जिल्हा व अति. सत्र न्यायालय, नेवासा, येथे पोहोच करण्याची संबंधीत फर्मची जबाबदारी राहील.

१०. दरपत्रकाबाबत संपर्क करण्याचा अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न करु नये अन्यथा दरपत्रक नाकारण्याचा अधिकार जिल्हा व अति. सत्र न्यायालय, नेवासा यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

११. कोणतेही कारण न देता दरपत्रके स्विकार अथवा अस्विकार करणेचा अधिकार जिल्हा व अति. सत्र न्यायालय, नेवासा या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.

१२. ज्यांचे दरपत्रक वरील अटींचे व शर्तीची पूर्तता करुन कमी दराचे असेल त्यांचेच दरपत्रक स्विकारण्यात येईल तसेच सदर वस्तुंचे गुणवत्तेमध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१३. दरपत्रक स्विकारल्यानंतर सदर वस्तुंचा पुरवठा १० दिवसात पुरविणे आवश्यक आहे अन्यथा दरपत्रकाच्या रकमेच्या १० % रक्कम नुकसान भरपाई म्हणुन या कार्यालयात भरावी लागेल.

सदरचे दरपत्रक बुधवार दिनांक ०१/०१/२०२५ रोजी सायंकाळी ०६-०० पुर्वी मा. जिल्हा न्यायाधीश-१ व अति. सत्र न्यायाधीश, जिल्हा व अति. सत्र न्यायालय, नेवासा यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी १०.३० ते सायंकाळी ०६.०० या कार्यालयीन वेळेत आणून देणे आवश्यक आहे. तद्नंतर या कार्यालयात प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक १७/१२/२०२४ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्यानिशी जाहिर नोटीस प्रसिध्द केली असे.

COURT OF ADDL. DIST. COURT
NEWASA

( डी. वाय. जाधव )
जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश नेवासा, जि.अहमदनगर.

जा. क्र. ३०६९ /२०२४ ))
जिल्हा व अति. सत्र न्यायालय, नेवासा ))
दिनांक- १७/१२/२०२४ ))

टिप :- अधीक्षक, जिल्हा व सत्र न्यायालय, नेवासा यांनी सदर जाहीर नोटीस खालील नमुद ठिकाणी बेलिफामार्फत संबंधीतांस निर्देशित होईल अशी बजावणी करुन त्याबाबत संबंधित बेलिफाने त्याबाबतचा अहवाल निम्नस्वाक्षरीकारांना सादर करावा.

प्रत :-

१. मा. जिल्हा व अति. सत्र न्यायालय, नेवासा
२. मा. तहसिलदार, तहसील कार्यालय, नेवासा
३. मा. उपकोषागार अधिकारी, उपकोषागार कार्यालय, नेवासा
४. मा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी
५. नेवासा येथील अधिकृत फर्निचर विक्रेते